सेंन्ट्रल हिंन्दू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे,
भोसला मिलिटरी कॉलेज,
रामभूमी,नासिक ५

दिनांक १६/०८/२०२५

**"Pandit Dindayal Upadhyay Swayam Yojana"**

**"पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् "**

<u>शिष्यवृत्ती योजना</u>

**शैक्षणिक वर्ष २०२५—२६ मध्ये प्रवेशित सर्व विद्यार्थ्यांना कळविण्यात येते की, खालील नमूद शासकीय शिष्यवृत्ती योजनांसाठी अर्ज प्रक्रिया सुरू झाली आहे. त्वरीत ऑनलाईन पध्दतीने शिष्यवृत्ती फॉर्म भरून आवश्यक कागदपत्रासह त्वरीत महाविदयालयात जमा करावेत.**

अनुसूचित जमातीच्या शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना इयत्ता 12वी नंतरच्या उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधारसंलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्याबाबत. "पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजना" राबविण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

- सदर योजनेंतर्गत सन 2016-17 या शैक्षणिक वर्षापासून सद्यस्थितीत शासकीय वसतीगृहात प्रवेश न मिळालेल्या एकूण 20,000 विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत अनुसूचित जमातीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाकरीता भोजन, निवास व शैक्षणिक साहित्यासाठी त्यांच्या आधार संलग्न बँक खात्यामध्ये थेट रक्कम वितरण करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी खालीलप्रमाणे निकष असतील –

**मुलभूत पात्रता**

- विद्यार्थी अनुसूचित जमातीचा असावा. विद्यार्थ्याने अर्जासोबत जात पडताळणी प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.
- विद्यार्थ्याच्या पालकाचे उत्पन्न रु.2.50 लाख पेक्षा जास्त नसावे. तसेच केंद्र शासनामार्फत ज्या ज्या वेळी मॅट्रीकेत्तर शिष्यवृत्तीसाठी उत्पन्न मर्यादेत वाढ होईल, त्यानुसार या योजनेसाठी पालकाची वार्षीक उत्पन्न मर्यादा लागू राहील.
- विद्यार्थ्याने स्वत:चा आधार क्रमांक आपले राष्ट्रीयकृत बँक खात्याशी संल्लग्न करणे बंधनकारक राहील. **Pandit Dindayal Upadhyay Swayam Yojana**
- विद्यार्थ्याने प्रवेश घेतलेली शैक्षणिक संस्था ज्या शहराच्या ठिकाणी आहे अशा शहरातील सदर विद्यार्थ्याचे पालक रहिवाशी नसावेत.
- सदर योजनेचा लाभ मिळाल्यानंतर विद्यार्थ्याने संबंधित शहरामध्ये राहणे आवश्यक राहील.
  1. सदरचा विद्यार्थी 12वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असावा.
  2. केंद्र शासनाच्या पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती करीता निश्चित करण्यात आलेल्या अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांना सदर योजनेंतर्गत लाभ देण्यात येईल.
  3. तथापि, दोन वर्षापेक्षा कमी कालावधीच्या अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ मिळणार नाही.

4. एका शाखेची पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी या योजनेचा लाभ घेतल्यानंतर पुन्हा इतर शाखेच्या पदवी किंवा पदव्युत्तर अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यास या योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही.
5. यामध्ये प्रथम पदवी पूर्ण न करता दुसऱ्या पदवीसाठी प्रवेश मिळाल्यास सुध्दा लाभ घेता येणारा नाही.
6. अखिल भारतीय तंत्रशिक्षण परिषद, अखिल भारतीय वैद्यकीय परिषद, भारतीय फार्मसी परिषद, वास्तुकला परिषद, राज्य शासन किंवा तत्सम संस्था इ. मार्फत मान्यताप्राप्त महाविद्यालयात/संस्थेमध्ये व मान्यता प्राप्त अभ्यासक्रमासाठी विद्यार्थ्यास प्रवेश मिळालेला असावा.
7. विद्यार्थ्याची संस्थेमधील / महाविद्यालयातील उपस्थिती 80 टक्केपेक्षा अधिक असणे आवश्यक राहील. विद्यार्थ्यांची निवड करताना गुणवत्तेनुसार निवड करण्यात येईल. **(संबधीत विषय शिक्षक व विभाग प्रमुखांच्या स्वाक्षरीने प्रमाणित केलेला विदयार्थ्यांचा उपस्थिती तक्ता सोबत जोडणे बंधनकारक आहे)**
8. निवड करण्यात आलेल्या विद्यार्थी संबंधित अभ्यासक्रम पूर्ण होईपर्यंत लाभास पात्र राहील.
9. मात्र विद्यार्थ्यास प्रत्येक वर्षी त्या त्या अभ्यासक्रमाच्या परिक्षेत उत्तीर्ण होणे अनिवार्य राहील.

इतर निकष

- योजनेचा लाभ 12वी नंतरचे उच्च शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यास देण्यात येईल.
- तथापि एका विद्यार्थ्यास जास्तीत जास्त 7 वर्षे सदर योजनेचा लाभ घेता येईल.
- सदर योजनेचा 7 वर्षे लाभ घेतल्यानंतर त्या विद्यार्थ्यास वसतीगृहात प्रवेश मिळणार नाही.
- सदर योजनेस पात्र विद्यार्थी अनुत्तीर्ण झाल्यास योजनेंतर्गत लाभ देण्यात येणार नाही.
- सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्यांचे कमाल वय 28 वर्षापेक्षा अधिक नसावे.
- योजनेचा लाभ घेण्यासाठी विद्यार्थ्याने आदिवासी विकास विभागाच्या संगणक प्रणालीद्वारे ऑनलाईन अर्ज करणे आवश्यक राहील.
- विद्यार्थ्यास आदिवासी विकास विभागाच्या सामाजिक न्याय विभागाच्या किंवा संबंधित शैक्षणिक संस्थेच्या वसतीगृहामध्ये मोफत प्रवेश मिळालेला नसावा.
- विद्यार्थी कोणत्याही प्रकारची नोकरी किंवा व्यवसाय करत नसावा. **"Pandit Dindayal Upadhyay Swayam Yojana"**
- आदिम जमातीच्या व अनुसुचित जमातीच्या अपंग विद्यार्थ्यांना सदर योजनेचा लाभ प्राधान्याने देय राहील.

**महत्वाची सूचना —**
**विद्यार्थ्यांनी आपली पात्रता तपासून संबंधित फॉर्म ऑनलाईन पध्दतीने भरून फॉर्म व आवश्यक कागदपत्रे फॉर्म महाविद्यालयात शिष्यवृत्ती विभागात एक प्रत तर दुसरी प्रत** मा. प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,आदिवासी विकास भवन, जुना आग्रा रोड, नाशिक **जमा करावीत.**

प्राचार्य,
भोंसला मिलिटरी कॉलेज,
रामभूमी, नाशिक

# उपस्थिती प्रमाणपत्र
## शैक्षणिक वर्ष २०२५–२६

कु________________________या विदयार्थ्यांने / विदयार्थीनीने शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये________________या वर्गामध्ये अनुदानित /विनाअनुदानित विभागातुन ______________या प्रवर्गामध्ये प्रवेश घेतला आहे. तीची/त्यांची उपस्थिती वर्गामध्ये पुढील प्रमाणे आहे.

| अ.क्र. | विषय | उपस्थिती टक्केवरी मध्ये | विषय शिक्षकाचे नाव | विषय शिक्षकाची स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| ०१ | | | | |
| ०२ | | | | |
| ०३ | | | | |
| ०४ | | | | |
| ०५ | | | | |
| ०६ | | | | |
| ०७ | | | | |
| ०८ | | | | |
| ०९ | | | | |
| १० | | | | |
| ११ | | | | |
| १२ | | | | |
| १३ | | | | |
| १४ | | | | |
| एकुण टक्केवारी | | | विभाग प्रमुखांची स्वाक्षरी :– | |

$\frac{\text{एकुण विषयाची टक्केवरीची बेरीज}}{\text{एकुण विषय}}$ =एकुण टक्केवरी

विदयार्थी स्वाक्षरी
मो.नंबर______________

पालकांची स्वाक्षरी
मो.नंबर______________